# मेट्रो-३चे सहावे भुयार पूर्ण

## तानसा जलवाहिनीखालून मेट्रोचे काम

**मुंबई(प्रतिनिधी) :**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ भुयारी मार्गिकेमधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सहार रोडदरम्यानचे सहाव्या भुयाराचे काम बुधवारी पूर्ण झाले. हे भुयार ६९२ मीटरचे आहे. सहार रोड मेट्रो स्थानकाच्या निर्माणस्थळावरून जाणाऱ्या मुंबईतील सर्वात जुन्या तानसा जलवाहिनीला धक्का न लावता भुयारीकरणासह स्थानक निर्माणाचे काम करण्यात आले आहे.

भारतातील सर्वात पहिल्या संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम सध्या शहरात वेगाने सुरू आहे. यातील पाच भुयारांचे काम पूर्ण झाले आहे. तर प्रकल्पातील आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सहार रोडदरम्यानचे सहावे भुयार बुधवारी खोदून पूर्ण झाले. भुयारीकरणासाठी वापरण्यात आलेले ८९ मीटर लांब 'तापी १' या टीबीएम यंत्राने ६९२ मीटरचे भुयार १६० दिवसांत खणले. या दरम्यान यंत्राचा वेग प्रतिदिवस ४.३१ मीटर इतका होता. आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील निर्माण स्थळावरून या यंत्राने गेल्या वर्षी १३ सप्टेंबरला भुयारीकरणाचे काम सुरू केले होते. १५० निष्णात अभियंते आणि कामगारांची फौज यासाठी कार्यरत होती.

